**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विनोद सुभाष जवळकर
अे/२, मुक्तानंद सोसायटी,सर्व्हे नं.११, चव्हाणनगर, धनकवडी, पुणे-४३ .. अपीलकर्ता

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
तहसीलदार, हवेली, जि. पुणे
.. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा**
निवासी नायब तहसीलदार, हवेली
तहसील कार्यालय हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | २०१३ / पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | ११.३.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** - गैरहजर<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार, हवेली, जि. पुणे श्री. विजय पाटील<br>**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय हवेली, जि. पुणे श्री. जगदीश निंबाळकर | |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

आपण मागणी केलेले फेरफार व ७/१२ उतारे शुल्क भरुन प्राप्त करून घेण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली यांनी आपल्याला कळविले. प्रत्यक्षात अभिलेख

शाखेशी संपर्क साधला असता कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या नाहीत. 'काही माहिती पुरविली असून फेरफार क्र. १५८८ तसेच स.क्र. ५७/३८ चे सन १९६४ ते १९७० दरम्यानच्या ७/१२ चा शोध घेऊन माहिती पुरविण्याबाबत कार्यवाही करीत आहोत,' असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. संदेश शिर्के व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली श्री. संजीव देशमुख यांनी दि. ३०.४.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले होते. त्यानंतरही कागदपत्रे मिळाली नाहीत. कागदपत्रे आढळून येत नाहीत, शोधकाम चालू आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. जगदीश निंबाळकर वेळोवेळी सांगत व कळवत राहिले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. विनोद सुभाष जवळकर यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व लेखी निवेदनात पूरक कागदपत्रांसह केली आहे.

१५५८ हा फेरफार सन १९६५ मधील आहे. अभिलेख जीर्ण झालेले आहेत, अपीलकर्ता यांनी कागदपत्र अवलोकन केलेले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.जगदीश निंबाळकर यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली श्री. विजय पाटील यांनी त्यास दुजोरा दिला. तथापि अद्यापही ही कागदपत्रे आपल्याला मिळाली नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. जवळकर यांनी दि. १९.५.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. ती पाहता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. संदेश शिर्के यांनी आयोगापुढे केलेल्या निवेदनाची सत्यता स्पष्ट होणे आवश्यक आहे. तसेच संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रती देता येत नसेल तर प्रमाणित प्रतिलिपी देऊन माहितीची पूर्तता करता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित प्रकरणी आयोगापुढे केलेल्या निवेदनाच्या सत्यतेबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. संदेश शिर्के यांना दि. २३.४.२०१० रोजी पत्र देऊन खुलासा मागविण्यात आला होता. हा खुलासा न केल्याबद्दल कारवाई का करण्यात येऊ नये, याची कारणे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. संदेश शिर्के यांनी आठ दिवसांत आयोगाला सादर करावीत.

३.	अपीलकर्ता श्री. विनोद सुभाष जवळकर यांच्या मागणीनुसार संबंधित कागदपत्रांबाबत अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली यांनी विशेष पथकाद्वारे शोध घेऊन पंधरा दिवसांत आयोगाला अहवाल सादर करावा.

पुणे
दि. 29 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय मनोहर गुटाळ
मु.पो.पांगरे,ता.करमाळा,
जि.सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रादेशिक सह संचालक (साखर)
पुणे विभाग, शिवाजीनगर, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी संचालक,
श्री आदिनाथ सह.साखर कारखाना लि.,शेलगाव भाळवणी,
ता.करमाळा,जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५०/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०८.०४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री.संजय मनोहर गुटाळ<br>मु.पो.पांगरे,ता.करमाळा,<br>जि.सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रादेशिक सह संचालक (साखर)<br>पुणे विभाग, शिवाजीनगर, पुणे श्री.डी.आर.घोडे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी संचालक,<br>श्री आदिनाथ सह.साखर कारखाना लि.,शेलगाव भाळवणी,<br>ता.करमाळा,जि.सोलापूर श्री.अरविंद एस.पाटील | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.संजय मनोहर गुटाळ यांनी मागितलेली माहिती नाकारलेली नाही. तीन वर्षांतील अत्यंत विस्तृत प्रमाणातील व अनेक मुद्दे मोघम असलेली माहिती त्यांनी मागितलेली होती.

त्याबाबत स्पष्टता करण्याविषयी व ती देण्यास तयार असल्याचे त्यांना १० दिवसांतच कळविले होते. अपीलकर्त्यांनी तशा स्वरुपाचा तपशील देणारा अर्ज करावा व जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री आदिनाथ सह.साखर कारखाना लि.,शेलगाव भाळवणी,ता.करमाळा,जि.सोलापूर यांनी नियमाप्रामणे शुल्क आकारुन माहिती द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सह संचालक (साखर), पुणे विभाग, शिवाजीनगर, पुणे यांनी दिला, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि., शेलगाव भाळवणी, ता.करमाळा,जि.सोलापूर श्री.अरविंद एस.पाटील यांनी नमूद केले.

आपल्याला पुन्हा अर्ज दाखल करण्यास सांगणे हा विलंब लावण्याचा प्रकार आहे. ३० दिवसांत माहिती दिली नसल्यामुळे ती निःशुल्क देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.गुटाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडील अर्जात केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि., शेलगाव भाळवणी, ता.करमाळा,जि.सोलापूर श्री.अरविंद एस.पाटील यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले आहे. अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सह संचालक (साखर), पुणे विभाग, शिवाजीनगर, पुणे यांच्या निर्णयानुसार अपीलकर्ता श्री.गुटाळ यांनी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक असतानाही केलेला नाही. तरी त्यांच्या मूळ अर्जातील आता स्पष्ट झालेल्या मुद्यांबाबत तीन दिवसांत शुल्क कळवून माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,श्री आदिनाथ सह.साखर कारखाना लि.,शेलगाव भाळवणी, ता.करमाळा,जि.सोलापूर श्री.अरविंद एस.पाटील तथा यांनी दि.११.०४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**स्थळ : पुणे**
**दि. 29 JUN 2010**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. आलम अमिन तांबोळी
रा.आळंदी देवाची,
ता.खेड, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
नगर परिषद आळंदी देवाची,
ता.खेड, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
नगर परिषद आळंदी देवाची,
ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५९/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५/०३/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६/०४/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६/०४/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** आळंदी नगरपरिषदेच्या शिक्षणमंडळात कार्यरत असलेले श्री.बांडे, श्री.नेहरे, श्रीमती. बांडे, श्रीमती. गव्हाणे व श्रीमती. परदेशी यांच्या सेवापुस्तकाच्या छायाप्रती, शाळासुधार निधी व पगारपत्रके इ. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. आलम अमिन तांबोळी यांच्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता. अपीलकर्ता श्री. तांबोळी यांना इतरांच्या सेवापुस्तकाच्या सरसकट झेरॉक्स प्रतींची मागणी करता येणार नाही. तसेच जन माहिती अधिकारी,नगर परिषद आळंदी देवाची यांनी अपीलकर्त्यास माहिती दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 11 JUN 2010

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.किरण ठाकूर
०३, इंद्रायणी, पत्रकारनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग प्रमुख, संज्ञापन व
वृत्तपत्र विद्याविभाग, पुणे विद्यापीठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०९१+२०९२+२०९३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.किरण ठाकूर
०३, इंद्रायणी, पत्रकारनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे प्रतिनिधी श्री.बी.डी.उढाणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे श्रीमती अरूणा वि.चव्हाण

नाही,' असे उत्तर आपल्याला देण्यात आले. अनेक मुद्दयावर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यांनी 'नो कॉमेंटस' असे उत्तर दिले आहे. मूळ प्रश्नाचे ते उत्तर नाही. आपला प्रस्ताव विद्यापीठाने अनुदान आयोगाकडे न पाठविण्याचा निर्णय तत्कालीन प्रभारी विभाग प्रमुखांनी व्यक्तिगत आकसातून घेतला असून विद्यापीठ नियमावलीतील कोणत्या तरतुदीनुसार प्रस्ताव न पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला याची स्पष्ट माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.किरण ठाकूर यांनी केली.

श्री.ठाकूर यांनी सादर केलेल्या संशोधन प्रकल्पाच्या प्रस्तावावरील संज्ञापन व वृत्त विभागाचे तत्कालीन विभागप्रमुख श्री.प्रसन्नकुमार अकलूजकर यांनी दिलेल्या अभिप्रायाची व त्यावरील कार्यवाहीची माहिती श्री.ठाकूर यांना मुद्देनिहाय दिली. विभाग प्रमुखांनी शिफारस केली असेल तरच संशोधन प्रकल्पाचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविला जातो. वर्षानुवर्षे विद्यापीठाने अवलंबिलेली ती कार्यपध्दती आहे, असे त्यांना स्पष्ट केले. तसेच संबंधित अभिलेखाचे अवलोकन त्यांनी करावे व त्यातील त्यांना हवी असलेली कोणतीही माहिती प्राप्त करून घ्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ गणेशखिंड रोड, पुणे यांनी दिला. त्यानुसार काही माहिती श्री.ठाकूर यांनी घेतलीही. त्यांच्या तीनही अर्जांवरील माहिती देण्याची पूर्तता केली आहे. प्रशासकीय कार्यवाहीबाबतचे त्यांचे आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे श्रीमती अरूणा चव्हाण यांनी केले.

श्री.ठाकूर यांच्या प्रस्तावावर विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीचा सर्व तपशील त्यांना देण्यात आला. ज्या मुद्दयांबाबत कार्यवाही झालेली नव्हती, तेथे 'नो कॉमेंटस' असे नमूद केले. त्यात प्रामुख्याने 'विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संकेतस्थळावर पाहणी करून नियमावलीबाबतची निश्चिती करावी, या सूचनेनुसार काय केले,' 'कार्यवाही केली का, त्यातून काय निष्पन्न झाले,'

अशा स्वरूपाच्या विचारणेचाही समावेश होता, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.बी.डी.उढाणे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यांनी अपीलकर्त्यांना विहित मुदतीत उत्तर दिले आहे. तसेच संबंधित 'माहिती' पुरविली आहे. अपीलकर्त्यांच्या अर्जात व पत्रव्यवहारात नमूद केलेले मुद्दे प्रामुख्याने त्यांच्या संशोधन प्रकल्पाबाबत तत्कालीन विभाग प्रमुखांनी व विद्यापीठाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या प्रशासकीय कार्यवाहीबाबत आक्षेप घेणारे, तसेच त्याबाबतचा अभिप्राय, खुलासा, भविष्यकालीन कार्यवाही याची विचारणा करणारे आहेत. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत बसत नाहीत. तथापि ज्या संदर्भात निर्णय झालेला नाही तेथे 'नो कॉमेंटस' अशा स्वरूपाचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक, कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यांनी दिलेले उत्तर योग्य नाही. निर्णय झाला नसल्यास / कार्यवाही केली नसल्यास तसे स्पष्टपणे उत्तरात नमूद करणे आवश्यक आहे. मात्र अभिप्राय, खुलासा संभाव्य कार्यवाही याबाबतच्या मुद्दयांमध्ये असे उत्तर देणे आक्षेपार्ह मानता येणार नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाकडे संशोधन प्रकल्प प्रस्ताव पाठविण्याबाबतची पुणे विद्यापीठात अवलंबिण्यात येणारी कार्यपध्दती, विद्यापीठ अनुदान आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे व ज्या मुद्दयांच्या संदर्भात निर्णय / कार्यवाही झालेली नाही तेथे तसे स्पष्टपणे उत्तर, अशी माहिती अपीलकर्त्यास तीन दिवसात निःशुल्क पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार विद्यापीठ नियमावलीतील तरतुदींच्या प्रतीसह संशोधन प्रकल्पाबाबतची कार्यपध्दती व विद्यापीठ अनुदान आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे याची माहिती दिल्याचा अहवाल संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ डॉ.पंडित विद्यासागर यांनी दि.१२.३.२०१० च्या पत्रान्वये आयोगास संबंधित माहितीच्या प्रतीसह सादर केला. तथापि 'नो कॉमेंटस्' असे उत्तर दिलेल्या मुद्दयांबाबतचा तपशील मिळाला नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.ठाकूर यांनी दि.१३.३.२०१० व दि.२५.३.२०१० च्या

पत्रांन्वये केली. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यांनी उत्तर देय असलेल्या अशा मुद्दयांबाबत स्पष्ट उत्तर त्वरित देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अर्जांमधील 'नो कॉमेंटस्' असे उत्तर दिलेल्या, तसेच केवळ प्रश्नार्थक म्हणून उत्तर नाकारलेल्या व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ च मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत बसणाऱ्या मुद्दयाबाबत नेमकेपणाचे उत्तर (उदा.कार्यवाही केली / नाही, निर्णय घेतले / नाही, कार्यवाही / निर्णय झाला असल्यास त्याची माहिती) अपीलकर्त्यास त्वरित देऊन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यांनी अनुपालन अहवाल दि.१५.७.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
25 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री.मिलिंद माधवराव पुरंदरे
सर्व्हे नं.१/१-अ/१३, हॉटेल पवित्रासमोर,
बाणेर रोड, पुणे-४५ .. अपीलकर्ता

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद पुणे .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
शामराव कलमाडी हायस्कूल,
५६-५७, डॉ.केतकर रोड, एरंडवणा, पुणे-४

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | २१२०/पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | २३.३.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** - श्री.मिलिंद माधवराव पुरंदरे<br>सर्व्हे नं.१/१-अ/१३, हॉटेल पवित्रासमोर, बाणेर रोड, पुणे-४५<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे श्री. प्रकाश परब<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक, शामराव कलमाडी हायस्कूल,<br>५६-५७, डॉ.केतकर रोड, एरंडवणा, पुणे-४ श्रीमती कामिनी सक्सेना | |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २३.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी न्यायालयातील आरोपींना जामीन राहिल्याच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती उपलब्ध नसल्याचे व अशा प्रकारची नोंद ठेवली जात नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शामराव कलमाडी हायस्कूल, एरंडवणा, पुणे यांनी कळविले. संस्थेतील कर्मचारी काय करतात याची माहिती संस्थेकडे असली पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. मिलिंद माधवराव पुरंदरे यांनी केली.

आपण जून २००९ पासून प्राचार्य पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. अपीलकर्त्याने मागणी केलेल्या स्वरूपाची माहिती शाळेकडे ठेवली जात नाही, असे तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. पुरंदरे यांना विहित मुदतीत कळविले, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शामराव कलमाडी हायस्कूल, एरंडवणा, पुणे श्रीमती कामिनी सक्सेना यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शामराव कलमाडी हायस्कूल, एरंडवणा, पुणे यांनी प्रत्येक मुद्दयाबाबत दिलेली माहिती योग्य असून त्यामुळे अपील फेटाळले, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री. प्रकाश परब यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शामराव कलमाडी हायस्कूल, एरंडवणा, पुणे यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री. प्रकाश परब यांनी यांनी दिलेला निर्णय स्वयंस्पष्ट असून अपीलकर्त्याची मागणी योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कालिदास दादू लोणारे
उत्तमनगर, एन.डी.ए.जवळ,
मु.पो.कापरे, ता.हवेली,जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा निबंधक वर्ग-१,
पुणे शहर, ५ फायनान्स रोड,
शासकीय छायाचित्र नोंदणी, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** दुय्यम निबंधक (वर्ग-२),
हवेली क्र.४, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१३६/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.०४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** -श्री.कालिदास दादू लोणारे
उत्तमनगर, एन.डी.ए.जवळ,
मु.पो.कापरे, ता.हवेली,जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा निबंधक वर्ग-१,
पुणे शहर, ५ फायनान्स रोड,
शासकीय छायाचित्र नोंदणी, पुणे-१ श्री.व्ही.डी.धनशेट्टी

**जन माहिती अधिकारी तथा** दुय्यम निबंधक (वर्ग-२),
हवेली क्र.४, पुणे श्री.व्ही.एस.कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अंर्ज केल्याची तारीख | दि.०७.०३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.०३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.०४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०५.०६.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

<u>विवेचन</u>

आपण द्रारिद्र्यरेषेखाली असतानाही जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक (वर्ग-२), हवेली क्र.४, पुणे यांनी पुनर्वसनातील करारनामे, कुलमुखत्यारपत्रे आदि माहितीसाठी शुल्काची मागणी केली, व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा निबंधक वर्ग-१,पुणे शहर, ५ फायनान्स रोड, शासकीय छायाचित्र नोंदणी, पुणे यांनीही जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य ठरविला. तो रद्द करुन आपल्याला संबंधित कागदपत्रांच्या नकला मिळाव्यात, अशी मागणी अपीलकर्ता श्री.कालिदास दादू लोणारे यांनी केली.

श्री.लोणारे यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या नकलांसाठी नोंदणी कायद्यात शुल्क निर्धारित केलेले आहे. त्यानुसार शुल्क कळविले. अन्य व्यक्तींच्या कुलमुखत्यारपत्राच्या प्रती नोंदणी कायद्यानुसार संबंधित व्यक्तीव्यतिरिक्त इतरांना देता येणार नाहीत. तसेही त्यांना कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक (वर्ग-२), हवेली क्र.४, पुणे श्री.व्ही.एस.कुलकर्णी यांनी केले.

विविध कायद्यांतर्गत येणाऱ्या नकलांसाठी निर्धारित केलेले शुल्क अपीलकर्त्याने भरणे आवश्यक आहे. दारिंद्र्य रेषेखाली असल्याच्या कारणावरुन माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ असलेली नि:शुल्क माहितीची सवलत अशा प्रकारच्या नकला नि:शुल्क मागण्यासाठी देता येणार नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 18 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री.संतोष प्रभाकर तोडकर
मु.पो.शिनोळी, ता.आंबेगाव, जि.पुणे .. अपीलकर्ता

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
आंबेगाव तहसील कार्यालय,
ता.आंबेगाव, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
आंबेगाव तहसील कार्यालय, ता.आंबेगाव, जि.पुणे

.. उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | २१७२/पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | २३.३.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री.संतोष प्रभाकर तोडकर<br>मु.पो.शिनोळी, ता.आंबेगाव, जि.पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,<br>आंबेगाव तहसील कार्यालय, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री. देवराम हरिभाऊ पिंगळे | |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २३.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

दारिद्र्य रेषेखालील व अंत्योदय शिधापत्रिका धारकांना केलेल्या धान्य वाटपाबद्दल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव यांची चुकीची माहिती दिली. एकीकडे डिसेंबर २००७ मध्ये दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना तांदूळ व गहू हे धान्य गोदामात शिल्लक नसल्यामुळे देण्यात आले नाही, असे उत्तर दिले, तर दुसरीकडे डिसेंबर २००७ मध्येच दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना ९८ कि. गहू पुरविल्याचे उत्तर दिले. या विसंगतीची दखल न घेता अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, आंबेगाव यांनी दोन्ही उत्तरे बरोबर असल्याचा निष्कर्ष काढून अपील फेटाळले. या वाटपाबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे, अशी मागणी अपीलकर्ता श्री. संतोष प्रभाकर तोडकर यांनी केली.

पहिल्या माहितीत ९८ कि. गहू लिहिलेला नव्हता. तत्कालीन लिपिक श्री. हरिभाऊ बोराडे यांनी नंतरच्या माहितीत ते नमूद केले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव श्री. देवराम हरिभाऊ पिंगळे यांनी केले.

दोन्ही उत्तरांमधील तफावतीचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव श्री. देवराम हरीभाऊ पिंगळे हे करू शकले नाहीत. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव श्री. दिगंबर रौधांळ व लिपिक श्री. हरिभाऊ बोराडे यांनी या विसंगतीबाबतचा खुलासा आठ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे आयोगाचे आदेश विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव यांनी त्यांना कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तिघांनीही आयोगाला सादर केलेला नाही, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	आयोगाच्या मौखिक आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव श्री. दिगंबर रौंधळ व लिपिक श्री. हरिभाऊ बोराडे यांना कळविण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव श्री. देवराम हरिभाऊ पिंगळे यांनी दि. ३०.७.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

३.	तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आंबेगाव श्री. दिगंबर रौंधळ व लिपिक श्री. हरिभाऊ बोराडे यांनी अपीलकर्त्याला दिलेल्या दोन उत्तरांमधील विसंगतीबाबतचा खुलासा दोघांनीही दि. ३०.७.२०१० पर्यंत आयोगाला सादर न केल्यास ते शास्तीस पात्र ठरतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रामेश्वर पाटीलबा नागरे
मु.पो.दोंदे, ता.खेड,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
मामासो मोहोळ विद्या विकास मंडळ,
पुणे-३०

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
विद्या विकास मंदिर, अवसरी बुद्रुक,
ता.आंबेगाव,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१९६/पुणे |
| २ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. रामेश्वर पाटीलबा नागरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक

कागदपत्रे जोडलेली नाहीत. तरीही दि.२३/१२/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास व त्यानंतर प्रस्तुत अपील प्रकरणी दि.१६/०४/२०१० रोजी आयोजित केलेल्या सुनावणीसही अपीलकर्ता हे अनुपस्थित होते. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 18 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. एहसान मेहबुब खान
रा.१८३५/२६, भिमपुरा कॅम्प,
पुणे-४११००१

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),**
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (मुख्यालय),**
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२१५/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७/०४/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६/०४/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/०५/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५/०५/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पुणे शहराचे तत्कालीन पोलीस आयुक्त श्री.धनंजय जाधव यांचा कार्यकाल, त्यांची मुले, मुलांचा व्यवसाय इ. तपशील | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. एहसान मेहबुब खान यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता सहायक जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर यांनी दि.१६/०४/२००८ रोजी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर यांनी दि.१४/०५/२००८ रोजी दिलेला निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 10 JUN 2010

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बा.द.दसरे
वैदेही सहकारी गृहरचना संस्था मर्या.४५, गिरीजा सोसायटी,
एम.आय.डी.सी.जवळ, कोथरूड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे डॉ.के.एस.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.वि.वि.कोकरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.५.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.६.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२५.७.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता म्हणून श्री.बा.द.दसरे यांचे नाव असले तरी स्वाक्षरी त्यांची आहे की, श्री.श्रीकांत विठ्ठल ढोले यांनी केली आहे, याची शहानिशा केल्यास अर्ज नेमका कोणाचा आहे हे स्पष्ट होईल. मात्र अपीलकर्त्यांच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर देऊन शुल्क कळविले. शुल्क भरल्यानंतर रजिस्टर टपालाने सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती पाठविल्या. वैदेही सहकारी गृहरचना संस्था मर्या.४५, गिरीजा सोसायटी एम.आय.डी.सी.जवळ, कोथरूड, पुणे या एकाच सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भात श्री.दसरे वा त्यांच्या नावे विविध अर्ज व अपिले करण्यात आली असून वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे. अशाच स्वरुपाचे त्यांचे अन्य अपील क्रमांक /२३६०/पुणे हे आयोगाने निकाली काढले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१), पुणे श्री.वि.वि.कोकरे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे डॉ.के.एस.जाधव यांनी केले. श्री.दसरे अर्जात व समक्ष चर्चेत असंसदीय व अपमानकारक भाषा वापरतात, अशी तक्रारही त्यांनी केली. श्री.दसरे यांनी आयोगाकडे सादर केलेली निवेदने पहाता त्यांची तक्रार रास्त दिसते. अपीलकर्त्याची ही कृती योग्य नाही, याची समज देण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत योग्य कार्यवाही केली असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या निवेदनांमधून स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 18 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दिनानाथ केशव बन
'केशवकुंज' २५/१/१, शिवराजनगर,
राहाटणी, पुणे-१७

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव,**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड,
पुणे-७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड,
पुणे-७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५२/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पुणे विद्यापीठात विशेष कार्य अधिकारी (O.S.D) हे पद प्रथम केंव्हा निर्माण झाले, सदर पदावर कोणा-कोणाची नियुक्ती झाली त्यांचा सविस्तर कालावधी व सदर पदी सेवा निवृत्तीनंतर नेमणूक झाली आहे का, याबाबतची माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२३/१२/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. दिनानाथ केशव बन हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्ता श्री.बन यांना त्यांच्या माहिती-मागणी

अर्जानुसार सर्व माहिती दिलेली आहे, तसेच उत्तरासोबत नियमावलीची कागदपत्रे देखील दिलेली आहेत', असे जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे श्रीमती अरुणा चव्हाण यांनी पूरक कागदपत्रांसह प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 24 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिलकुमार बावधनकर
हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई-पुणे रोड,
कासारवाडी, पुणे-३४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क),**
जिल्हा परिषद सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२८८/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.संभाजीराव कडू पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी सातारा जिल्हा परिषदेतील कार्यकालावधी दरम्यान घेतलेल्या प्रवास भत्ता बिलांच्या छायाप्रती, प्राप्तीकर विवरणपत्रांच्या छायाप्रती व श्रीमती रेश्मा रमेश खरात यांच्याविरुध्द करण्यात आलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा तपशील | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.सुनिलकुमार बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.), यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी दिलेला निर्णय योग्य आहे.

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि. २३/१२/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' तील प्रपत्रातही जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.), जिल्हा परिषद सातारा श्री.तुकाराम गारळे व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.अंकुश बगाटे यांनी अपीलकर्त्यास मुदतीत माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ... खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 18 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत तुकाराम आनंदे
मु.पो.सासवड, संगीत विद्यालयाजवळ, सोपाननगर, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, सासवड,
ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत तुकाराम आनंदे
मु.पो.सासवड, संगीत विद्यालयाजवळ, सोपाननगर, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.देवदत्त ठोंबरे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, सासवड,
ता.पुरंदर, जि.पुणे श्री.एस.व्ही.चंदनशिवे

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

रास्त भाव धान्य दुकानदारांना स्वत: घेतलेल्या लाभासह काही मुद्दयांची माहिती आपण मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे यांनी ती दिली नाही, अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे यांनी अपिलाचा निर्णय दिला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.वसंत तुकाराम आनंदे यांनी केली.

अपीलकर्ता यांना कळविलेले शुल्क त्यानी भरले नाही, ते भरल्यास तेवढी माहिती देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे यांनी केले. ते रास्त आहे. अपीलकर्त्यास माहिती आवश्यक असल्यास नियमानुसार योग्य ते शुल्क भरून प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती रेणुका अनिरुध्द गोडबोले
डी-३, वेंकटेश हेरिटेज,
३/४+५ अे, कर्वेनगर,
पुणे-५२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ प्रिंटिंग टेक्नॉलॉजी,
विनाअनुदानित पदविका विभाग,
१७८६, सदाशिव पेठ,
पुणे-३०

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३६९/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अशंकालीन पदविका मुद्रण तंत्रज्ञान अभ्यासक्रम विभागाकडून पूर्णवेळ अनुदानित विभागाच्या कर्मचाऱ्यांना मिळालेल्या मानधनाचा तपशील | |

**विवेचन**

अपीलकर्त्या श्रीमती रेणुका अनिरुध्द गोडबोले यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत.

विनाअनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. श्रीमती गोडबोले यांच्या याच संस्थेसंदर्भातील अन्य अपिलांमध्ये राज्य माहिती आयोगाने यापूर्वी निर्णय दिलेले आहेत. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 18 JUN 2010